राष्ट्रीय रुरबन मिशन (National Rurban Mission-NRuM) या अभियानांतर्गत राज्य व्यवस्थापन कक्षाकरीता पदे निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः रुरबन-२०१७/प्र.क्र. १३३/योजना-१

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक: १२ सप्टेंबर, २०१७

वाचा-१) या विभागाचा शासन निर्णय क्र. एनआरएम २०१६/प्र.क.०१/योजना ०४ दि.१४ जानेवारी,२०१६

प्रस्तावना

राष्ट्रीय रुरबन मिशन (National Rurban Mission-NRuM) या अभियानांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील विकासाचा असमतोल दूर करणे, यामध्ये प्रामुख्याने आर्थिक व तांत्रिक सोयी सुविधा ग्रामीण भागामध्ये उपलब्ध करुन देणे, ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करताना गरीबी व बेरोजगारी कमी करणे, या अभियानांतर्गत निवडलेल्या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणे व ग्रामीण भागातील गुंतवणूकीस चालना देणे इत्यादी उद्दिष्टे साध्य करुन या गाव समुहांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजना व राज्य शासनाच्या योजना या नियोजनबध्द पध्दतीने, एककेंद्राभिमूख रितीने व विशिष्ट कालमर्यादेत या गाव समुहांमध्ये राबविणे अपेक्षित आहे. केंद्र शासन व राज्य शासनाकडून ६०:४० प्रमाणात या गाव समुहांना Critical Gap Funding (CGF) अंतर्गत निधी प्राप्त होणार आहे. या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे व सनियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार राज्य व्यवस्थापन कक्षाकरीता पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

राष्ट्रीय रुरबन मिशन (National Rurban Mission-NRuM) या अभियानांतर्गत या विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च स्तरीय सचिव समितीने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ च्या बैठकीत तीन पदे निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन राष्ट्रीय रुरबन मिशन (National Rurban Mission-NRuM) या अभियानांतर्गत खालील प्रमाणे नवीन पदे निर्माण करण्यात येत आहेत.

अ.क्र	पदनाम	वेतनक्षेणी/मानधन रु.	पदाची संख्या
१	राज्य समन्वयक (प्रतिनियुक्तीने) उपमुख्य कार्यकारी अधिकारी या संवर्गतील अधिकारी	७०,०००/- प्रतीमहा	१
२	एम.आय.एस. अधिकारी (बाह्यंयंत्रणेद्वारे)	४०,०००/-प्रतीमहा	१
३	कार्यलयीन सहायक (लेखा/योजना) (बाह्ययंत्रणेद्वारे)	१५,०००/-प्रतीमहा	१

उपरोक्त नमूद केलेल्या पदांवरील वेतन व भत्यांचा खर्च राष्ट्रीय रुरबन मिशन (National Rurban Mission-NRuM) या अभियानांतर्गत एकूण मिळणा-या निधीच्या "२ टक्के प्रशासकीय निधी" मधून चालू वर्षी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२१३०६१६३९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2017.09.22 13:02:57 +05'30'

(अनिल काळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
५. मा.महालेखापाल (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई व नागपूर

६. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव
७. मा. अपर मुख्य सचिव (वित्त/नियोजन)
८. मा.सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक.
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. जिल्हाधिकारी (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१२. सहसचिव/ उपसचिव, ग्राम विकास विभाग (सर्व)
१३. निवडनस्ती.